बुधवार, दि २५ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २५ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# संगणक परिचालकांना १७ हजार रुपये मासिक मानधन द्या - आमदार लोणीकर

## संगणक परिचालकांच्या आंदोलनाला भेट

**मुंबई -** राज्यातील सुमारे २८५०० ग्रामपंचायतीमध्ये २० हजार संगणक परिचालक मागील १४ वर्षापासून प्रामाणिकपणे काम करून राज्याध्या ग्रामीण भागातील सुमारे ७ कोटी जनतेला विविध प्रकारच्या ऑनलाईन व ऑफलाईन सेवा देणाऱ्या संगणक परिचालकांना महागाईच्या काळात अतिशय तुटपुंजे मानधन असून तेही ६-६ महिने मिळत नाही, ही परिस्थिती लक्षात घेता आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याशी प्रत्यक्ष भेटून संगणक परिचालकांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

यावलकर समितीने ग्रामविकास विभागास दिनांक ३० मे २०१८ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार व ग्रामविकास विभागाचे तत्कालीन ग्रामविकासमंत्री मा. गिरीशजी महाजन साहेब यांच्या अध्यक्षतेखाली ११ जानेवारी २०२३ रोजी घेतलेल्या बैठकीतील निर्णयानुसार व राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या कामाची गरज लक्षात घेता संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे अत्यंत गरजेचे आहे. अशी मागणी संगणक परिचालक संघटनेने केली असता आमदार बबनराव लोणीकर यांनी तुमचा आवाज निश्चितपणे मुख्यमंत्री महोदयापर्यंत पोहोचवतो असा शब्द उपस्थित त्यांना दिला.

महाराष्ट्र राज्य संगणकपरिचालक संघटनेच्या वतीने ग्रामविकास विभागाकडे अनेक वेळा मागणी करून सुद्धा ग्रामविकास विभागाने अद्याप पर्यंत यावलकर समितीच्या शिफारशीनुसार कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्या संदर्भात कार्यवाही केलेली नाही, त्याच बरोबर ग्रामपंचायतीच्या १५ व्या वित्त आयोगातून निधी मिळत नसल्याने संगणक परिचालकांना ६-६ महीने मानधन मिळत नसल्याने २०२४ व्या विधानसभा निवडणूकी अगोदर आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पासाठी राज्याच्या निधीतून ३३६ कोटी रुपये वार्षिक निधीची तरतूद केली असल्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री मा. एकनाथरावजी शिंदे साहेब, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्यासह अर्थमंत्री मा. अजितदादा पवार साहेब यांनी केली होती व १० ऑक्टोबर २०२४ च्या कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाल्याचे सोशल मिडीयात प्रसारित केले होते या बाबीची आठवण देखील आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना करून देऊ असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

ग्रामविकास विभागाने दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात संगणकपरिचालकांना ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे किंवा आपले सरकार सेवा केंद्रासाठी राज्याच्या निधीतून वार्षिक ३३६ कोटी रुपयेची तरतुद केल्याचा कोणताही उल्लेख केला नाही, त्याचवेळी ११ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्य संघटनेच्या वतीने निवेदन देऊन शुद्धीपत्रक निर्गमित करण्याची विनंती केली होती, परंतु त्यावर कोणतीही कार्यवाही ग्रामविकास विभागाने केली नाही उलट ११ ऑक्टोबर २०२४ चा शासन निर्णय कुणालाही विचारात न घेता ०५ ऑगस्ट २०२५ रोजी रड करून राज्यातील ग्रामपंचायत संगणकपरिचालकांवर अन्याय केला आहे. तसेच सध्या मागील १.५ वर्षापासून संगणकपरिचालकाची नियुक्ती कोणत्याही कंपनीकडून नाही, त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर कर्मचारी दर्जा देऊन किमान वेतन देणे आवश्यक आहे अशी मागणी देखील संगणक परिचालक आंदोलन आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे केली.




संगणकपरिचालक हे ग्रामीण भागातील सुमारे ७ कोटी नागरिकांना वेगवेगळ्या प्रकारच्या ऑनलाईन व ऑफलाईन सेवा देण्याचे काम करत असताना आजच्या महागाईच्या काळात तुटपुंजे असलेले १०,००० रुपये मानधन तरी प्रत्येक महिन्याच्या एका निश्चित तारखेला संगणक परिचालकांना मिळाले पाहिजे यासाठी ग्रामविकास विभागाने नियोजन करणे आवश्यक असताना संगणक परिचालकांना केलेल्या कामाचा मोबदला ६-६ महिने मिळत नाही. प्रत्येक वेळी मानधनासाठी शासन स्तरावर निवेदन द्यावे लागते, आंदोलन करावे लागते हि बाब दुर्दैवी असून संगणक परिचालकांची ही मागणी रास्त आहे यासाठी आपण निश्चितपणे ग्रामविकास मंत्र्यांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करू असे हे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

शासना समोर संगणक परिचालकांचा मुद्दा मांडला असता दिनांक १६ मार्च २०२४ रोजी च्या मंत्रीमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार ग्रामपंचायतीनी पैसे नाही दिले तर सदरील मानधनाची रक्कम शासनाकडून देण्यात **पान २ वर**

# पोलीस प्रशिक्षण केंद्रातील बाराशे प्रशिक्षणार्थींची मधुमेह निदान चाचणी

## सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट व रुबी हॉस्पिटलचा संयुक्त उपक्रम

**जालना | प्रतिनिधी -** वाढत्या धकाधकीच्या जीवनात आरोग्याप्रती सजगता निर्माण करण्यासाठी सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्ट आणि रुबी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक पोलीस प्रशिक्षण केंद्रात मोफत मधुमेह निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात मधुमेह तज्ञ डॉ. राजेश सेठीया आणि त्यांच्या टीमने तब्बल १२०० भावी पोलीस जवानांची आरोग्य तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले.

पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अशोक बनकर आणि वैद्यकीय अधीक्षिका डॉ. जस्मिन शाह यांच्या विशेष पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया आणि डॉ. राजेश सेठीया यांची प्रमुख उपस्थिती होती. दररोज १०० प्रशिक्षणार्थी याप्रमाणे १२ दिवस चाललेल्या या मोहिमेत सर्व १२०० प्रशिक्षणार्थींची रक्तातील साखरेची तपासणी करण्यात आली. मार्गदर्शन करताना डॉ. राजेश सेठीया म्हणाले की, रिकाम्या पोटी साखर १०० असणे सामान्य आहे, मात्र ती १२६ पर्यंत असल्यास प्रिडायबेटिक स्थिती मानली जाते. पोलीस प्रशिक्षणातील व्यायाम आणि कसरतीमुळे तरुण तंदुरुस्त असतात, तरीही वर्षातून एकदा चाचणी करणे गरजेचे आहे. योग्य आहार आणि विहाराने मधुमेह कायमचा टाळता येतो. गेल्या वर्षी रोटरी आणि बगडिया ट्रस्टतर्फे दीड लाखांहून अधिक मधुमेह चाचण्या करण्यात आल्या होत्या. यावर्षी ट्रस्टतर्फे मोफत दहा हजार थायरॉईड चाचण्यांचा उपक्रम राबविण्यात





येत असून, आतापर्यंत शिबिरांच्या माध्यमातून साडेसहा हजार चाचण्या पूर्ण झाल्या आहेत. पन्नालाल बगडिया म्हणाले की, आमच्या ट्रस्टच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत १० हजार थायरॉईड चाचण्यांचे उद्दिष्ट ठेवले आहे. पोलीस दल हे समाजाचे रक्षक आहे, त्यामुळे ते स्वतः शारीरिकदृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक आहे. भावी पोलिसांमध्ये मधुमेहाबाबत जनजागृती व्हावी, याच उद्देशाने आम्ही हे शिबिर आयोजित केले.

पोलीस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य अशोक बनकर म्हणाले की, पोलीस प्रशिक्षणात शारीरिक कसरतीला अत्यंत महत्त्व आहे. प्रशिक्षणार्थी कठोर मेहनत घेतात, मात्र अंतर्गत आजारांकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून आम्ही या चाचणीचा निर्णय घेतला. अशा उपक्रमांमुळे प्रशिक्षणार्थींना आपल्या शारीरिक स्थितीची नेमकी माहिती मिळते आणि भविष्यातील धोके टाळता येतात. बगडिया ट्रस्टचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे ते म्हणाले.

# सीसीआय खरेदी प्रक्रिया सुरु ठेवा; नोंदणीस मुदतवाढ द्या

## आ. अर्जुनराव खोतकर यांची अधिवेशनात मागणी

**मुंबई -** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी लक्षवेधी सूचनेच्या तासात शेतकरी बांधवांच्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर जोरदार चर्चा झाली. शिवसेन उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सभागृहात सीसीआयमार्फत सुरू असलेली कापूस खरेदी बंद करू नये तसेच नोंदणीसाठी मुदतवाढ द्यावी, अशी ठाम मागणी केली.



राज्यातील अनेक कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी अजूनही आपला कापूस विक्रीसाठी नोंदवलेला नाही. बाजारभावातील चढ-उतार आणि तांत्रिक अडचणींमुळे अनेकांना सीसीआयकडे नोंदणी करता आलेली नाही. अशा परिस्थितीत अचानक खरेदी बंद झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते, असा मुद्दा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित केला.

सभागृहातील भूमिका आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की:

''राज्यातील शेतकरी आधीच नैसर्गिक संकटे आणि कमी बाजारभावामुळे अडचणीत आहे. अजून असंख्य शेतकऱ्यांच्या घरात कापूस मोठ्या प्रमाणात आहे त्यामुळे सीसीआयची खरेदी बंद करू नये व खरेदी प्रक्रिया सुरू ठेवावी आणि नोंदणीस मुदतवाढ द्यावी.''

त्यांनी शासनाकडे तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली. सीसीआय कापूस खरेदी तात्काळ बंद करू नये, ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेस मुदतवाढ द्यावी संबंधित मंत्री महोदयाचे उत्तर दिले ते म्हणाले यावर संबंधित मंत्र्यांनी विषय गांभीर्याने घेतला असून लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

## संपादकीय

# मराठी भाषेचा जागतिक गौरव आणि आपली जबाबदारी

मातृभाषेला विसरू नका, ही केवळ भावनिक हाक नाही, तर सांस्कृतिक अस्तित्व टिकवण्याचा मूलमंत्र आहे. भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती समाजाच्या इतिहासाची, परंपरेची, संस्कारांची आणि विचारधारेची जिवंत परंपरा असते. मराठी भाषेचा गोडवा, तिची अभिव्यक्तीची ताकद आणि सांस्कृतिक समृद्धी यामुळेच ती जगात वेगळी ओळख निर्माण करते.

२७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषेच्या गौरवाचा कारण हा दिवस आधुनिक मराठी साहित्याचे मानदंड मानले जाणारे महान साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस. पुणे येथे १९१२ साली जन्मलेले कुसुमाग्रज यांनी कविता, कथा, नाटक, समीक्षा अशा विविध माध्यमांतून मराठी साहित्याला जागतिक स्तरावर पोहोचवले. त्यांच्या लेखनाने मराठी भाषेला विचारांची खोली, सामाजिक जाणीव आणि मानवतावादी दृष्टिकोन दिला. त्यामुळेच त्यांच्या जन्मदिवशी 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करणे हे केवळ औपचारिक स्मरण नाही, तर भाषेच्या अस्मितेचा उत्सव आहे. मराठी भाषेची ताकद तिच्या साधेपणात आणि संवेदनशीलतेत आहे. ती सोज्वळ आहे, सहज शिकता येते आणि भावनांना प्रभावी अभिव्यक्ती देते. महाराष्ट्र या भूमीचा इतिहास, परंपरा आणि संस्कृती मराठी भाषेतच जिवंत आहेत. हीच भाषा संतवाङ्मयाची, समाजसुधारकांच्या विचारांची, क्रांतिकारकांच्या प्रेरणेची आणि लोकजीवनाच्या भावविश्वाची वाहक आहे. मराठीचा उगम आणि उत्कर्ष हा या भूमीच्या ऐतिहासिक संघर्षाशी जोडलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याच्या संकल्पनेतून स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक आत्मभान यांचा जो संदेश मिळाला, त्यातूनच मराठी भाषेची ओळख अधिक दृढ झाली. संत परंपरा, समाजसुधारकांचे विचार, स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारकांचे योगदान या सर्वांनी मराठीला केवळ भाषा न ठेवता एक जिवंत संस्कृती बनवले.

परंतु आजच्या जागतिकीकरणाच्या युगात भाषिक ओळख टिकवण्याचे आव्हान वाढले आहे. इंग्रजी आणि इतर जागतिक भाषांचे महत्त्व मान्य असले तरी मातृभाषेकडे दुर्लक्ष होणे ही चिंतेची बाब आहे. भाषा टिकते ती वापरातून, अभिमानातून आणि पुढील पिढीकडे जाणीवपूर्वक दिलेल्या संस्कारातून. मराठीचा वापर कमी होणे म्हणजे संस्कृतीच्या मुळांवर आघात होणे.

मराठी भाषा दिवस साजरा करणे म्हणजे केवळ कार्यक्रम, भाषणे किंवा औपचारिक घोषणांपुरते मर्यादित राहू नये. त्याऐवजी काही मूलभूत प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे

आपण दैनंदिन व्यवहारात मराठीचा किती वापर करतो?

पुढील पिढीला मराठी वाचनाची सवय लावतो का?

मराठी साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान आणि डिजिटल क्षेत्रात आपण भाषेचा विस्तार करतो का?

मराठी भाषेचा खरा गौरव म्हणजे तिचा आधुनिक संदर्भात वापर वाढवणे. शिक्षण, संशोधन, प्रशासन, डिजिटल माध्यमे, साहित्य आणि कला प्रत्येक क्षेत्रात मराठीची सशक्त उपस्थिती निर्माण करणे हीच खरी भाषाभक्ती आहे.

आज गरज आहे ती भावनिक घोषणांपेक्षा कृतीशील भाषाभिमानाची. आपल्या घरात, शाळेत, समाजात आणि सार्वजनिक जीवनात मराठीचा सन्मानपूर्वक वापर केला, तरच भाषेचा वारसा जिवंत राहील.

मराठी ही केवळ महाराष्ट्राची भाषा नाही ती इतिहासाची स्मृती, संस्कृतीचा श्वास आणि ओळखीचा आधार आहे. त्यामुळेच प्रत्येक मराठी भाषिकाचे कर्तव्य आहे की मराठीला केवळ जपणे नव्हे, तर तिला समृद्ध करणे, विस्तार देणे आणि जागतिक पातळीवर प्रतिष्ठा मिळवून देणे.

# शासकीय सेवा व योजनांचा महामेळाव्याचे आयोजन




**जालना । प्रतिनिधी -** नागरिकांच्या प्रलंबित शासकीय अडचणी सोडवण्यासाठी आणि विविध सरकारी योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने पुढाकार घेण्यात आला आहे. शनिवार दि.२८ फेब्रुवारी रोजी भोकरदन तालुक्यातील राजूर येथे भव्य शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महामेळाव्यात महसूल, कृषी, आरोग्य, शिक्षण, समाजकल्याण, पोलीस प्रशासन, महावितरण आणि परिवहन यासह किमान ३० विविध शासकीय विभागांचे स्टॉल्स उभारले जाणार आहेत. अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नितेश एम. बंडगर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

राजूर-भोकरदन रोडवरील पुण्याई लॉन्स येथे सकाळी १० वाजता या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा जालना जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती अरुण आर. पेडणेकर यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. तर न्यायमूर्ती सुशील मनोहर घोडेस्वार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा एम. मोहिते असतील. कार्यक्रमास जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक अजय बन्सल, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. बाबासाहेब इंगळे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अनिरुद्ध घुले पाटील आणि भोकरदन तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रवींद्र पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. असेही कळविले आहे.

## वैशिष्ठ्यपूर्ण कला महोत्सव या महोत्सवाचे आयोजन

**जालना -** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने 'वैशिष्ठ्यपूर्ण कला महोत्सव' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन जालना येथे करण्यात आले आहे. हा सोहळा बुधवार, दि.२५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता, जे. ई. एस. महाविद्यालयातील चुनीलालजी गोयल सभागृह, जालना येथे होत आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सांस्कृतिक महोत्सव पार पडणार आहे. या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील विविध लोककला प्रकारांचे सादरीकरण करणारे १०० हून अधिक कलाकार एकाच मंचावर येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने वासुदेव कलावंत, कडकलक्ष्मी, बहुरूपी, पोतराज आणि आराधी यांसारख्या पारंपरिक लोककलांचे जिवंत दर्शन प्रेक्षकांना घडणार आहे. महाराष्ट्राची लोकसंस्कृती जतन करणे आणि या दुर्मिळ होत चाललेल्या लोककलांना ऊर्जितावस्था देणे हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. जालना जिल्ह्यातील नागरिकांसाठी ही एक सुवर्णसंधी असून, रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केलेले आहे.

पान १ वरुन

## संगणक परिचालकांना ...

येईल अशी हमीच शासनाने घेतलेली आहे. तसे ग्रामविकास विभागाच्या दिनांक १९ जुन २०२४ च्या शासन निर्णयात नमूद केलेले आहे. त्यामुळे महिन्याच्या एका निश्चित तारखेला संगणक परिचालकाचे मानधन करण्यची जबाबदारी शासनाची आहे, तरीही या महत्वाच्या मुद्द्याकडे ग्रामविकास विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून संगणक परिचालकांना वेळेवर मानधन देत नाही, हा संगणक परिचालकांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून मी स्वतः पुढाकार घेईल असे हे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

यावलकर समितीच्या शिफारशीनुसार सुधारित आकृतीबंधात ग्रामपंचायत संगणक परिचालकांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन मिळणे, कर्मचारी दर्जा व किमान वेतन मिळण्यास वेळ लागत असेल तर सध्या असलेल्या १०००० रूपये मानधनात शासनाच्या निधीतून ७००० रु. वाढ करून संगणक परिचालकांचे मासिक मानधन १७००० रुपये करणे, ग्रामपंचायत संगणकपरिचालकांना कायमस्वरूपी जॉब सेक्युरिटी, कंत्राटी कामगारा प्रमाणे सर्व लाभ व सुविधा देणे, मागील १४ वर्षापूर्वी दिलेले संगणक व इत्तर साहित्य खराब झाल्याने संगणकपरिचालकांना ऑनलाईन कामकाज करण्यास अडथळा होत असल्याने राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीला शासनाने नवीन संगणक, प्रिंटर व इत्तर आवश्यक साहित्य पुरवणे, महिलां संगणकपरिचालकांना मानधनासहित प्रसूती रजा देणे, सर्व संगणक परिचालकांना किमान ५० लक्ष रुपयांचा अपघाती व आरोग्य विषयक विमा लागू करणे अशा मागण्यांची निवेदन संगणक परिचालकांनी आमदार बबनराव लोणीकर यांना दिले. यावेळी राज्याध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे राज्यसचिव मयूर कांबळे जालना जिल्हाध्यक्ष विजयानंद येडेकर अशोक चव्हाण, विष्णू ढोबळे. नारायण सोळंके, विजय प्रधान, केशव लहाने, हनुमान वाघ, जनार्धन इंगळे, भरत कल्हले, गणपत घारे रामेश्वर मुरकुटे, राम सुपेकर. ज्ञानेश्वर सूर्यवंशी. विजय वाघ. भरत कवळे. गणेश अहिरे. संग्राम ढिकले. विवेक देवरे. सुरेश मगर. शैलेश संत. सचिन माळी. सागर पवार. सचिन गरड. स्वप्निल अंभोरे. अविनाश आढे. दिलीप गाढवे. प्रल्हाद राऊत. ओम प्रकाश प्रधान. ज्ञानेश्वर साळवे यांच्यासह हजारोंच्या संख्येने संगणक परिचालक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

मराठी भाषा गौरव दिन

# वाचा... बोला... लिहा... शिका... शिकवा... टिकवा... मराठी

मराठी भाषा गौरव दिनाचे उद्देशा पैकी महत्त्वाचे उद्देशात, शिक्षणात मराठीचा वापर वाढविणे, मराठी भाषेचे महत्त्व समजावणे,मराठी साहित्य, आणि भाषेचा गौरव करणे. तिच्या संवर्धनासाठी जे जे प्रयत्न आवश्यक आहेत ते करणे. विकासासाठी चालना देणे ही आहेत.

२७ फेब्रुवारी, हा मराठीतील जेष्ठ साहित्यिक, ज्ञानपीठ पारितोषिक प्राप्त तात्यासाहेब वि.वा. शिरवाडकर तथा कवि कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस. हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून आपण साजरा करत असतो.

मराठी साहित्यात कुसमाग्रजांचे योगदान मोठे आहे. त्यांची ग्रंथसंपदाही खूप मोठी आहे.येणाऱ्या पिढीला मराठीचा विसर पडू नये,मराठीचा वारसा पुढे चालावा म्हणूनच मराठी भाषा दिन किंवा ‘‘मराठी भाषा गौरवदिन‘‘ साजरा करण्याची प्रथा सुरु झाली.१९९९ पासून हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून शासनातर्फे जाहीर करण्यात आला.

तीनही वेगवेगळे दिवस १ मे रोजी साजरा होणारा मराठी राजभाषा दिन, २१ फेब्रुवारी रोजी साजरा होणारा जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येत असलेला मराठी भाषा गौरव दिन हे तीनही दिन वेगवेगळे दिन विशेष आहेत हा फरक समजून घ्यायला हवा.

गेल्या चार दशकांपूर्वी वि.वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा म्हणून मागणी केली होती. त्याची पूर्तता झालेली आहे.




महाराष्ट्रात, तसेच देशभरात जसे म.प्रदेश,कलकत्ता, आंध्रप्रदेश,गुजरात,गोवा,दमण-दीव,कर्नाटक, दिल्ली, ज्या ज्या ठिकाणी मराठी माणसांचा रहिवास आहे.मराठी मंडळे, महाराष्ट्र मंडळे आहेत त्या त्या ठिकाणीही मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. शाळा,कॉलेजेस,वाचनालयामध्ये मराठी भाषा गौरव दिवस साजरा होतो. अनेक प्रकाशक आपल्या पुस्तकावर यानिमित्ताने सवलती जाहीर करून पुस्तक विक्री करीत असतात. आपण हा दिवस साजरा करतो परंतु हा दिवस फक्त साहित्य केंद्रीत झाला आहे ? असा एक विचार मांडला जातो, बऱ्याच अंशी तो खरा आहे. कारण साहित्य हा भाषेचा भाग आहे. आपण त्या दिवशी फक्त कथाकथन, कविता वाचन, पुस्तक परिचय, अशाच कार्यक्रमातून समोर जात असतो. भाषेच्या संवर्धनासाठी काय करणे आवश्यक आहे आणि काय करावे याचा विचार मात्र कुठे होत नाही असे दिसते. थोडक्यात असे दिवस हे फक्त आता इव्हेंट म्हणून साजरे होतात गांभीरर्णे विचार मात्र होत नाही.

.महाराष्ट्रात वाचन संस्कृती रुजवण्यासाठी आणि वाढवण्यासाठी दरवर्षी १ ते १५ जानेवारी काळात वाचन पंधरवाडा (वाचन संकल्प महाराष्ट्राचा) राबवला जातो यामध्ये शालेय व महाविद्यालयीन स्तरावर सामूहिक वाचन, पुस्तक प्रदर्शन, आणि वाचन कट्टा यांसारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माणव्हावी हा हेतू असतो.

हा पंधरवडा केवळ एक कार्यक्रम नसून, वाचन संकल्प महाराष्ट्राचा या माध्यमातून एक चळवळ उभी राहावी हा उद्देश आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने मराठी भाषेचे संवर्धन, जतन आणि प्रसार करण्यासाठी दरवर्षी १४ ते २८ जानेवारी हा कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा केला जातो या कालावधीत निबंध स्पर्धा, काव्यवाचन, शुद्धलेखन कार्यशाळा व व्याख्याने यांसारख्या विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करून मराठी भाषेचा वापर वाढवण्यावर भर दिला जातो.

मराठी भाषेला पंधराशे वर्षांची परंपरा आहे. जगभरातल्या मोठ्या भाषिकांचा बोलणाऱ्यांचा समूह आहेत त्यात मराठीचा पंधरावा नंबर लागतो,तर नऊ कोटी माणसांची मातृभाषा मराठी आहे.

परदेशात अनेक ठिकाणी मराठी मंडळ, महाराष्ट्र मंडळ आहेत.मराठी सण-वार उत्सव ते मोठ्या उत्साहाने साजरे करत असतात. काही ठिकाणी तर मराठी शाळा काढल्या आहेत. साने गुरुजी, छत्रपती शिवाजी महाराज,अजूनही महापूरूषांचा परिचय करून देतात.साहित्य संमेलने भरवत असतात.मराठी पुस्तकाची प्रदर्शने भरवतात. आपल्या कडून साहित्यिक, कलाकारांना बोलावले जाते.मंदिरात उत्सव साजरे केले जातात.व्याख्याने आयोजित करतात.परदेशात राहून मराठी भाषा,सणवार सोडावे असे त्यांना वाटले नाही.आपण मात्र-

**लाभले आम्हांस भाग्य,बोलतो मराठी !**
**जाहलो खरेच धन्य,ऐकतो मराठी !!**
**असे म्हणूनच धन्यता मानतो.**

मी स्वतः मराठी असून मराठीला किती न्याय देतोय ? हे ही तपासणे गरजेचे आहे.खरं म्हणजे आता आपल्यालाच मराठीचा विसर पडत चाललाय, अनेक ठिकाणी मराठी शाळा बंद पडत असल्याचे दिसते.काही ठिकाणी विद्यार्थी आहे, तर शिक्षक नसतात,शिक्षक आहे तर विद्यार्थी नाही, अनेक ठिकाणी शाळा ईमारतीची पडझड झाली आहे.

महाराष्ट्रात मराठी शाळा टिकवण्यासाठी प्रयत्न करावा लागतो हीच मोठी शोकांतिका आहे....मराठी शाळेतच दर्जेदार शिक्षण आणि सर्व सुविधा पुरवा.. त्या का नाही पुरवीत.? इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळांनी जिल्हा परिषदेच्या किंवा महापालिकेच्या सरकारी प्राथमिक शाळांना सुरुंग लावला आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही

इंग्रजी जरूर शिका पण त्यासाठी मराठीचा अव्हेर करु नका.गेल्या काही वर्षात आपली मुलं इंग्रजी माध्यमातून शिकावित हा दृष्टिकोन फारच वाढत चाललाय. त्यामुळेच मुलांवर सुरुवाती पासूनच इंग्रजीत ओळख होत असल्याने मुले आता मराठीत बोलायला अडखळून लागले आहेत. त्यांच्या शिक्षणाची सुरुवातच अ. आ. ई. ऐवजी ए. बी. सी. डी. ममी-पप्पा,मॉम-डॅड पासून होते.इंग्रजी माध्यम शाळेत मुलं शिकतात ही आई वडिलांना प्रतिष्ठेची गोष्ट वाटू लागली आहे.आणि हीच मराठी साठी धोक्याची घंटा आहे, म्हटल्यास खोटे ठरणार नाही.येणारी पिढीच जर मराठीचा वारसा जपणार नसेल तर कसे होणार.

आज ग्रामीण भागातील मराठी शाळांची दशा आहेत हे आपण बघतोच आहे. जो तो आपल्या मुलांना इंग्लिश मीडियम शाळांमध्ये टाकण्यासाठी आग्रही आहेत. आहेत.लाखाच्या वर पैसे भरुन प्रवेश मिळवतात. मराठी शाळा बंद पडतात. प्राथमिक शिक्षण हाच मराठीच्या संवर्धनाचा पाया आहे . कारण याच वयात शिक्षण आणि संस्कार या गोष्टी मुलांवर होणे आवश्यक असते. परंतु इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्याचे आकर्षण मुलांबरोबर पालकांतही मोठ्या प्रमाणात आढळून येते, आणि त्यामुळे ज्याला आपण मराठीचा पाया म्हणतो त्या प्राथमिक शाळा बंद होण्याचे अवस्थेत आहेत. एकूणच सरकारी प्राथमिक शाळेची अवस्था अतिशय वाईट झाली आहे. त्या शाळा बंद करणे हा एकमेव मार्ग नसून त्यात सुधारणा घडवून आणणे हे तितकेच महत्त्वाचे आहे हा विचार करायला हवा आहे.

त्याचबरोबर सरकारी शाळेच्या संदर्भात अनेक गोष्टी आपल्याला सोशल मीडियातून बघायला वाचायला मिळतात मग त्यात, विद्यार्थी आहे पण शिक्षक नाही, शिक्षक आहे पण विद्यार्थी नाही, दोन्ही आहे पण शाळेच्या इमारतीची दुरावस्था आहे अशी कारणे असतात. त्याचबरोबर आता बऱ्याच शाळांमध्ये शिक्षकांच्या नैतिकतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. ज्याला आपण सरस्वती मंदिर म्हणतो ती ही शाळा जिथे शिक्षणाबरोबर संस्काराची अपेक्षा आपण करतो. शिक्षक हेच गुरु असतात म्हणतो, अशा काही शाळांमध्ये शिक्षक दारू पिऊन शाळेत येणे दारू पिऊन वर्गामध्ये नाच करणे कुठे कुठे तर शाळेमध्ये शिक्षक झोपून राहिल्याचे सुद्धा व्हिडिओ समोर आले आहेत. कळस म्हणजे आता तर काही शाळांमध्ये शिक्षकांचे विद्यार्थिनी बरोबरचे गैरवर्तन,अल्पवयीन मुलींबरोबर लैंगिक चाळे, प्रसंगी बलात्कार झाल्याच्या घटनाही आपण वाचल्या आहेत.खाजगी शाळांमध्ये ही अशा घटना घडतात. अशावेळी शिक्षण विभाग झोपला आहे काय ? किंवा अशा शिक्षकांवर कडक कारवाई करून त्याचे अहवाल का सादर होत नाही ? हाही प्रश्न विचारला जात आहे. मराठी शाळांची परिस्थिती चिंताजनक असून, इंग्रजी माध्यमाच्या आकर्षण, मराठी माध्यमातून शिकवण्याला कमी लेखले जाणे, ही प्रमुख आव्हाने आहेत. शहरी आणि निमशहरी भागात पालकांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे कल वाढल्याने मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या वेगाने कमी होत आहे.मराठी शाळांचे शिक्षक सुध्दा आपल्या मुलांना सरकारी मराठी शाळांमध्ये न घालता इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेतात. ते स्वतःच्या शाळेत शिक्षण देतात तर त्यांचा त्यांच्या शिकवण्यावर भरोसा नाही का ? अनेक सरकारी मराठी शाळांमध्ये चांगले वातावरण असते. नाही असे नाही. पण अशा काही शाळांच्या शिक्षकांच्या गैरवर्तणूकीने इतर मराठी शाळाही बदनाम होतात.होत आहेत.

आजच्या आधुनिक तंत्रज्ञान आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या युगात मराठी शाळांनी दर्जेदार शिक्षण देण्याची गरज आहे. व्यवहारात आणि शिक्षणात मराठीचा वापर वाढवणे, ही काळाची गरज आहे. हाच विचार एका साहित्य संमेलनाचे समारोपाची वेळी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी त्यांच्या भाषणात प्रामुख्याने मांडला होता.

रिक्षा-टॅक्सीवाला मराठीत संवाद साधत तुमच्याशी बोलतो. आपण उगीचच त्याच्याशी हिंदीतून बोलतो

छोट्या छोट्या गोष्टीतून आपण खूप काही करु शकतो. काय करु शकतो,मराठीत खूप मोठी साहित्य संपदा आहे. हजारांचे संख्येने पुस्तके, शेकडो दिवाळी अंक प्रसिद्ध होतात.यातले आपण किती वाचतो.वर्तमानपत्र किती जण वाचता? कुठल्या वाचनाला प्राधान्य देतो.वर्षभरात मराठीतल काही वाचण्याचा संकल्प करा.किमान पाच सात पुस्तके वाचा.वाचून जवळच्याला प्रवृत्त करा.काही चांगले ग्रंथ खरेदी करा.वाढदिवसाला, लग्न समारंभात पुस्तकांची भेट द्या.इंग्रजी माध्यमातून मुलाच्या शिक्षण असेल तरी त्यांना मराठीपासून तोडू नका. त्यांना मराठीतली चांगली चांगली पुस्तके वाचायला द्या, त्याच्यामध्ये आवड निर्माण करा.

निरनिराळ्या कार्यालयात कार्यालयीन कामकाज मराठीत व्हावे म्हणून शासनाने निर्णय घेतले आहे. सक्तीचे केले आहे.पण त्यातही प्रगती नाही.संपूर्ण महाराष्ट्रात सर्वच ठिकाणच्या पाट्या मराठीतच हव्यात हा आग्रह धरला पाहिजे.फक्त पाट्या मराठीत करून भागणार नाही. महाराष्ट्रात रहिवास करावयाचा त्याला मराठी भाषा अवगत असावी. त्यासाठी काहीतरी धोरण असावे.

कोणत्याही भाषेचे संगोपन होण्यासाठी तिचा वापर ज्ञानभाषा म्हणून ज्ञान संवर्धना साठी होणे आवश्यक आहे. आणि ज्ञानावर आधारित सर्व क्षेत्रांमध्ये मराठी भाषेचा वापर करण्यासाठी मराठी ही ज्ञानभाषा करण्यासाठी राज्य सरकार वचनाबद्ध असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्धा येथील साहित्य संमेलनात बोलले होते.

. सगळेच मराठी भाषा संवर्धनाविषयी विचार मांडतात.. ही जबाबदारी आता दोन्ही पातळीवर होणे आवश्यक आहे. शासनाने त्यांच्या बाजूला शक्य आहे ते आणि आवश्यक ते करायला हवे आणि आपल्या सगळ्यांच्या पातळीवर आपण जे काही करायला हवे जास्तीत जास्त मराठीचा वापर बोलण्यात, लिखाणात, कसा होईल हे बघायला हवे.

ज्ञानभाषा म्हणजे जी विज्ञान तंत्रज्ञान शिक्षण आणि विशेषतः उच्च शिक्षण मूलभूत संशोधन उद्योग वाणिज्य विधी व न्याय प्रशासन आधी प्रगतव्यवहार क्षेत्रात पूर्ण क्षमतेने व गुणवत्ता पूर्ण रीतीने समाजातील सर्व घटकांकडून ती वापरली जाते, तसेच बुद्धीवर्ग आपल्या क्षेत्रातील विचार मंथनासाठी तिचा वापर करतो अशी भाषा.

आता मराठीला अभिजीत भाषेचा दर्जा प्राप्त झाला असला तरी ती ज्ञानभाषा कशी होईल आणि टिकून राहील याचा विचार महत्त्वाचा आहे आणि ते सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहे. कारण वाचण्यातून लिहिण्यातून बोलण्यातून आणि दैनंदिन व्यवहारातून हे शक्य आहे.नुसत्याच गप्पा करून आणि संमेलनातून शक्य नाही. संमेलन होत रहातील, पुस्तक मोहोत्सव होत राहतील. त्यातून फार काही साध्य होत नाही हा नेहमीचाच अनुभव आहे. आता मराठी भाषा गौरव दिन आणि त्याच वेळेला विश्व मराठी साहित्य संमेलन नाशिक नगरीत संपन्न आहे. त्यावेळी मराठी भाषा मंत्री तसेच शिक्षण सांस्कृतिक मंत्री यांनी यासंदर्भात योग्य तो विचार करावा ही अपेक्षा आहे. नाहीतर सरकारी मराठी शाळा हा विषयच यापुढे बंद होण्याच्या मार्गावर आहे असे म्हणावे लागेल.

मराठी भाषा टिकवण्यासाठी आणि पुढे नेण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपण आपल्या दैनंदिन जीवनात जास्तीत जास्त मराठीतून संवाद साधला पाहिजे, मराठी ग्रंथ वाचले पाहिजेत आणि नव्या पिढीला मराठी भाषेचे महत्त्व समजावून सांगितले पाहिजे.ह्या वर्गावर म्हणजेच बालवयातच मराठी भाषेचे संस्कार झाले तर आणि तरच मराठी भाषा टिकणार आहे.

वाचा..बोला..लिहा..शिका..शिकवा..टिकवा मराठी. हीच आवश्यकता आहे, आणि हाच मराठी भाषेचा गौरव आहे.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव. .मोबा.८९९९५६६९१७**

# जनगणनेची कामे विहीत कालावधीत पूर्ण करावीत - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** भारताची आगामी जनगणना २०२७ ही पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणारी ऐतिहासिक जनगणना असून, या कामांची अंमलबजावणी विहीत कालावधीत आणि काटेकोरपणे पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आज जनगणना २०२७ पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा व प्रशिक्षण बैठक पार पडली. या बैठकीस जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील व नगर परिषद स्तरावर जनगणनेचे कामकाज पाहणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आयोजित प्रशिक्षणा दरम्यान त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, तहसीलदार जालना छाया पवार, तहसीलदार घनसावंगी पागोटे, तहसीलदार भोकरदन ज्ञानेश्वर काकडे, तहसीलदार जाफ्राबाद साबळे, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जनगणना २०२७ चा पहिला टप्पा 'घरसुचीकरण व गृहनिर्माण जनगणना' हा मे २०२६ मध्ये पार पडणार आहे. या टप्प्यात प्रत्येक घराची नोंद, घराची स्थिती, उपलब्ध सुविधा आदींची माहिती संकलित केली जाणार आहे. यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले.यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल माध्यमातून करण्यात येणार आहे. मोबाईल ॲपच्या साहाय्याने माहिती संकलित केली जाणार असून, माहिती भरताना अचूकता आणि पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक आहे. जनगणना कालावधीत कुटुंब प्रमुखांनी जी माहिती दिली जाईल, तीच माहिती कोणताही बदल न करता प्रणालीमध्ये नोंदवावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. चुकीची अथवा अपूर्ण माहिती टाळून जबाबदारीने काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले. जनगणनेत विचारण्यात येणाऱ्या माहितीनुसार प्रत्येक जिल्ह्यास शासनाकडून मिळणारा निधी, विविध विकास योजना, पायाभूत सुविधा, शैक्षणिक व आरोग्य सेवा यांसंबंधी धोरणात्मक निर्णय घेतले जातात. त्यामुळे जनगणना ही केवळ आकडेवारी नसून विकासाचे भक्कम आधारस्तंभ आहे, असेही त्यांनी नमूद केले.शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी अचूक जनगणना अत्यंत महत्त्वाची असून, सर्व संबंधितांनी समन्वयाने काम करून ही प्रक्रिया यशस्वी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

सदरील प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनासाठी जनगणना विभागातील नायब तहसीलदार सतिष तायडे, सहायक महसूल अधिकारी संपदा कुलकर्णी, महसूल सहाय्यक ज्ञानेश्वर गोरे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी रामेश्वर राख, सुहास सहाने, एस. जी. वांगे, अभिनव पांगारकर, सचिन शिंगणे, आशिष घोडखिंडीकर यांनी परिश्रम घेतले.

डिजिटल पद्धतीने जनगणना

या वेळी प्रगणक स्वतःच्या स्मार्टफोनचा वापर करून संकल्पनेतून अधिकृत मोबाईल ॲपद्वारे माहिती भरतील. नागरिकांनाही स्वतःहून माहिती भरण्यासाठी - ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे जनगणना अधिक वेगवान, अचूक आणि पारदर्शक होणार आहे.

दोन टप्प्यांत जनगणना प्रक्रिया

पहिला टप्पा : घरयादी व गृहगणना ():-१ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना स्वतः हून माहिती भरता येणार आहे.

प्रत्यक्ष क्षेत्रीय कार्य : १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ :-या टप्प्यात राज्यातील सर्व इमारती, जनगणना घरे व कुटुंबांची यादी तयार करण्यात येणार आहे. घरांची स्थिती, बांधकाम साहित्य, वापराचा प्रकार, उपलब्ध सुविधा व मालमत्तेची माहिती गोळा करण्यासाठी प्रगणक घरोघरी येऊन माहिती संकलित करणार आहेत.

दुसरा टप्पा : लोकसंख्या मोजणी

कालावधी : फेब्रुवारी २०२७ या टप्प्यात प्रत्येक व्यक्तीची तपशीलवार लोकसंख्यात्मक माहिती संकलित केली जाईल.

महत्त्वाची डिजिटल साधने - जनगणनेपूर्वी आयोजित कार्यशाळांमध्ये खालील प्रणालींचे प्रशिक्षण दिले जाणार आहे:

१. पोर्टल व्यवस्थापन व देखरेखीसाठी वेब पोर्टल



२. मोबाईल ॲप घरांची माहिती नोंदवण्यासाठी

३. वेब मॅपिंग ॲप प्रभार अधिकाऱ्यांकडून घरांचे ब्लॉक्स () तयार करण्यासाठी

४.- पोर्टल नागरिकांनी स्वतः माहिती भरण्यासाठी विचारले जाणारे प्रश्न

जिल्हासाठी मनुष्यबळाचा तपशील

प्रगणक- २८१४ दहा टक्के राखीव २८१

पर्यवेक्षक-४६९

क्षेत्रिय पर्यवेक्षक-६१

घरयादी व गृहगणना () टप्प्यात एकूण ३३ प्रश्न विचारले जाणार* असून त्यात मुख्यतः पुढील बाबींचा समावेश असेल:

घराची माहिती : बांधकाम साहित्य, वापर, स्थिती

कुटुंब माहिती : सदस्यसंख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव, अनुसूचित जाती/जमाती माहिती

सुविधा व मालमत्ता : पिण्याचे पाणी, वीज, शौचालय, इंटरनेट, संगणक/ लॅपटॉप, वाहन इत्यादी

प्रशिक्षणाचे वेळापत्रक

मास्टर ट्रेनर प्रशिक्षण: ९ मार्च ते १२ मार्च २०२६, पहिली बॅच -यशदा, पुणे (४ दिवस) दि. १४ मार्च १७ मार्च २०२६ यशदा, पुणे (४ दिवस)

जिल्हा/उपविभाग/तहसील/ शहर/मुख्यालय अधिकारी प्रशिक्षण: २६ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२६, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना (३ दिवस)

फील्ड ट्रेनर प्रशिक्षण: ६ एप्रिल ते ११ एप्रिल २०२६, जिल्हा स्तरावर (३ दिवस)

प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षण: २७ एप्रिल ते ८ मे २०२६, तालुका स्तरावर (३ दिवस) चार किंवा पाच बॅचेस मध्ये.

मानधन व साहित्य

दोन्ही टप्प्यांसाठी प्रगणक व पर्यवेक्षकांना एकूण २५,००० रुपये मानधन देण्यात येणार आहे. त्यात:टप्पा १ : ९,००० रुपये,टप्पा २ : १६,००० रुपये

कायदेशीर तरतूद व गोपनीयता

अंतर्गत विचारलेल्या प्रश्नांची अचूक माहिती देणे नागरिकांसाठी बंधनकारक आहे. जनगणनेत संकलित केलेली वैयक्तिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते व ती केवळ सांख्यिकीय उद्देशांसाठी वापरली जाते. यासाठी जनगणना कायदा १९४८ व जनगणना नियम १९९० मध्ये नमूद नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

# चिमुकल्या हातांनी साकारले स्वप्नांचे रंग

## कलर्स ऑफ माय इमेजिनेशन स्पर्धा

**परतूर । प्रतिनिधी -** ज्ञानलता पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'कलर्स ऑफ माय इमेजिनेशन' नावाने एक सुंदर चित्रकला स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत इयत्ता पहिली ते नववीच्या मुलांनी मोठ्या उत्साहात भाग घेतला आणि आपल्या कल्पनेने कागदावर छान चित्रे रेखाटली. ही स्पर्धा वर्धमान एजेंसीज यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेत इयत्ता पाचवी ते नववीच्या गटात मुलांनी खूप मेहनत घेतली. यामध्ये भीमराव कांबळे याने प्रथम क्रमांक मिळवला, तर रत्नप्रिया संजय व्यवहारे हिने द्वितीय आणि सिद्धी मुकुंद शेपाळ हिने तृतीय क्रमांक पटकावला. या मुख्य विजेत्यांशिवाय प्रत्येक वर्गातून एका हुशार विद्यार्थ्याला प्रथम क्रमांक देऊन गौरविण्यात आले. विजेत्या मुलांना आकर्षक ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देण्यात आले, तर सहभागी झालेल्या प्रत्येक मुलाला प्रोत्साहन म्हणून प्रमाणपत्र देण्यात आले.




सोमवारी शाळेत या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ झाला. यावेळी निहिल सकलेचा, गौतमजी सकलेचा, सुषमा सकलेचा पत्रकार राजकुमार भारुका तसेच शाळेचे अध्यक्ष डॉ. संदीप चव्हाण आणि संचालिका डॉ. दीपाली चव्हाण उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते मुलांचे कौतुक करण्यात आले. शाळेचे चित्रकला शिक्षक देवक सर यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. मुख्याध्यापक, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही स्पर्धा अतिशय आनंदी वातावरणात यशस्वी झाली.

# २ मार्चला लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. तरी जालना जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि. २ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा. ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही, अशा अर्जदाराचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचित करण्यात येत आहे. लोकशाही दिनात न्याय प्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# डिजेपी कॅम्पसमध्ये जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद



**जालना । प्रतिनिधी -** युवकांमध्ये क्रीडासंस्कार रुजविण्यासाठी व ग्रामीण भागातील खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने माय भारत, जालना व धरती जनसेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा कॅम्पस, रोहनवाडी रोड येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

स्पर्धेचे आयोजन जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर तसेच कॅम्पसचे प्रशासकीय अधिकारी श्री. अश्रूबा घाडगे व भागवत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धांमध्ये १०० मीटर धावणे (मुले व मुली), गोळाफेक (मुले व मुली) आणि खो-खो (मुले व मुली) या विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयांतील खेळाडूंनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. स्पर्धे दरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट क्रीडाप्रदर्शन करत उपस्थितांची दाद मिळवली.

विजेत्या खेळाडूंना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ट्रॉफी, पदके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रा. पुरुषोत्तम राखुंडे, मुकेश चव्हाण, विजय जऱ्हाड, डॉ. विठ्ठल कुचके, डॉ. मीनल ठोसर, डॉ. कृष्णकुमार सिंग, ऋषिकेश दिवटे, प्रीती कालुसे, अविनाश चव्हण, जयपाल राठोड आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.